● गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १८८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# कत्तलखान्याविरोधात हिंदू, जैन समाज आक्रमक

## रक्त सांडायलाही मागेपुढे पाहणार नाही- हिंदु महासभा

**जालना । प्रतिनिधी** - हिंदू संस्कृतीचा अपमान आणि संतभूमीची विटंबना करणारा कत्तलखाना जालना येथे कुठल्याही परिस्थितीत सुरू होऊ देणार नाही. कत्तलखाना उभारण्याचा प्रयत्न केल्यास हिंदू महासभा कोणत्याही टोकाला जाऊन संघर्ष करेल, रस्त्यावर रक्त सांडायलाही मागेपुढे पाहणार नाही, असा जळजळीत इशारा हिंदू महासभेचे प्रदेश संघठन मंत्री धनसिंह सूर्यवंशी यांनी दिला असून, अहिंसेच्या भूमीत हिंसेचे तांडव सहन केले जाणार नाही. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी यात जातीने लक्ष घालावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात धनसिंह सूर्यवंशी यांनी म्हटले आहे की, जालना ही प्रभु श्रीराम, जैन संत पु. गणेशलाल महाराज, आनंदी स्वामी महाराज, श्री स्वामी समर्थ, ब्रह्मचैतन्य महाराज यांच्या पवित्र चरणांनी पावन झालेली भूमी आहे. ताई आपल्या परिवारास भगवान बाबा आणि भीमसिंह महाराज यांचा संत वारसा लाभलेला आहे. जालना जिल्ह्यात लाखो गौसेवक आहेत. मोठ्या प्रमाणात गोशाळा ही आहेत. या संतांच्या भूमीत कत्तलखाना उभा राहिला तर संपूर्ण जिल्ह्यात वणवा पेटेल, जालना धगधगत्या आंदोलनाने हादरेल, असा कडाडून इशारा महासभेने दिला आहे. या भूमीत कत्तलखाना मंजूर केला, तर आम्ही रस्त्यावर उतरून कायदा हातात घेऊ! सरकारने त्वरित हा प्रस्ताव फेटाळून लावावा, अन्यथा महासभा आपल्या पद्धतीने उत्तर देईल, त्याची जबाबदारी प्रशासनाची असेल, असा गंभीर इशारा धनसिंह सूर्यवंशी यांनी दिला आहे.

### पंकजाताई! आम्ही जालनेकर आपली लेकरं आहोत...आमची मागणी गांभीर्याने घ्या

प्रभु श्रीराम , हिंदु जैन संत पु. गणेशलाल महाराज, आनंदी स्वामी, श्री समर्थ, ब्रम्हचैतन्य महाराज यांचे विचार अहिंसेच्या प्रसारासाठी आहेत. जालना ही अहिंसेची भूमी असून येथे कत्तलखाना मंजूर करणे म्हणजे अहिंसेचा अपमान आहे. जालना हे लाखो हिन्दू जैन भक्तांचे श्रद्धास्थान आहे. येथे प. पू. गणेशलालजी महाराज यांची निर्वाणभूमी आहे आचार्य श्री विरागसागर महाराजांचे समाधीस्थळ आहे. त्यामुळे जालना ही अहिंसेची भूमी असून येथे कत्तलखाना मंजूर करणे ही हिंदुत्वाचेतत्व आणि भारतीय संस्कृतीला धरून नाही. गेल्या पाच दशकांपासून येथे मोठ्या प्रमाणावर गोसेवा सुरू आहे. हजारो गायींचे संगोपन येथे करण्यात येते. शहरात मोठ्या प्रमाणात गोशाळा आहेत. हल्ली गोवंशाची चोरी ही वाढली आहे. अशा ठिकाणी कत्तलखाना उभारणे म्हणजे अहिंसावादी तत्वांना आव्हान देण्यासारखे आहे. पंकजाताई आम्ही तुमची लेकरं आहोत... आमची मागणी गांभीर्याने घ्या, अशी साद धनसिंह सूर्यवंशी यांनी घातली आहे.

## सकल जैन समाजाचा रस्त्यावर उतरण्याचा ईशारा




**जालना । प्रतिनिधी** - संतांची भूमी असलेल्या जालना शहरात कत्तलखाना उभारून हिंसेचा तांडव करण्याचा जुलमी निर्णय शासनाने त्वरित रद्द करावा; अन्यथा अहिंसावादी रस्त्यावर उतरून हा निर्णय रद्द करण्यासाठी सरकारला भाग पाडू, असा इशारा सकल जैन समाजाच्यावतीने देण्यात आला आहे.

जालना शहरात नियोजित कत्तलखान्याच्या उभारणीच्या निर्णयाविरोधात सकल जैन समाज आक्रमक झाला असून, हा निर्णय तातडीने मागे न घेतल्यास मोठे आंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात आज बुधवार दि. ५ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले. त्यात पुढे म्हटले आहे की, राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण खात्याने जालना येथे कत्तलखाना उभारण्याचे नुकतेच घोषित केले आहे. जालनानगरी सकल जैन समाजाचे प्रसिद्ध असे तीर्थक्षेत्र व श्रद्धास्थान आहे. थोर जैन संत, घोरतपस्वी पू. गणेशलालजी म. सा. यांची जालना ही निर्वाणभूमी तसेच देवमूर्ती येथे दिगंबर जैन समाजाचे संत आचार्य श्री विरागसागर महाराजांचे 'श्री विराग अक्षय समाधी तीर्थस्थळ' आहे. दरवर्षी लाखोंच्या संख्येत तीर्थस्थळाचे दर्शन करण्यासाठी भारतातून गुरुभक्त येत असतात. पू. गणेशलालजी म. सा. यांनी आपले पूर्ण आयुष्य अहिंसेचा प्रचार करण्यासाठी व्यतीत केले असून, त्यांनी भारतात अनेक ठिकाणी गोशाळा उभ्या केल्या व हजारो गायींना जीवदान देण्याचे पवित्र कार्य केले. मागील पाच दशकांपेक्षाही अधिक काळापासून त्यांच्या प्रेरणेने जालना येथे भव्य गोशाळा चालू आहे. या गोशाळेत हजारो गायींचे संगोपन केले जात आहे. तसेच शहरात व जिल्ह्यात अनेक गोशाळा आहेत. गोसेवेचा महायज्ञ जालना येथे आजही अविरतपणे कार्यरत आहे आणि म्हणूनच जालना हे आम्हा श्रद्धाळूसाठी अहिंसातीर्थ आहे. अशा या पवित्र पावन भूमीवर कत्तलखाना उभारण्याचा पशुसंवर्धन खात्याचा निर्णय अत्यंत वेदनादायी, दुखदायी व धक्कादायक आहे. या कत्तलखाण्याच्या माध्यमातून भविष्यात हजारो निष्पाप पशुंची हत्या केली जाईल, जे की पर्यावरणाला सुद्धा घातक घातक ठरणारे आहे, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

अहिंसावादी वर्ग या नियोजित कत्तलखान्याचा तीव्र निषेध करत आहे. पशू संवर्धन खाते, खरं तर या खात्याच्या नावातच पशू सुरक्षा-संवर्धन अपेक्षित असून, या खात्याचा जालना येथे कत्तलखाना उभारण्याचा निर्णय अनाकलनीय व निषिद्ध आहे. सध्या भारतात पशू हत्येचा नंगानाच चालू असून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर परदेशात मास विक्री केली जाते. त्याची आकडेवारीही थक्क करणारी आहे. भगवान महावीर, भगवान श्रीकृष्ण, मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम, महात्मा गांधी यांचा हा आपला भारत देश जीवदयेचा, अहिंसेचा पुरस्कर्ता आहे. कत्तलखाना उभारून हिंसेचा तांडव करण्याचा हा जुलमी निर्णय शासनाने त्वरित रद्द करावा. अन्यथा हा अहिंसावादी सकल जैन समाज जुलमी निर्णय रद्द करण्यासाठी रस्त्यावर उतरेल. जियो और जीने दो आणि अहिंसा परमो धर्मः या तत्वांवर ठाम राहून हा निर्णय रद्द करण्यासाठी समाज प्रयत्नशील राहील, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या स्तरावर सर्वतोपरी पान २ वर

## जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सीसीआय कापूस खरेदी केंद्र बंद ठेऊ नका! - खा.डॉ.कल्याण काळे

**जालना । प्रतिनिधी** - छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील हजारो शेतकरी कापूस उत्पादक असून, त्यांचे आर्थिक भवितव्य कापसाच्या योग्य दराने विक्रीवर अवलंबून आहे. मात्र सध्या भारतीय कापूस निगम (CCI) चे खरेदी केंद्र कधी बंद कधी चालु असल्याने शेतकऱ्यांना आपल्या कष्टाने पिकवलेल्या कापसाची योग्य बाजारपेठ मिळत नाही. परिणामी, ५०% पेक्षा जास्त शेतकऱ्यांचा कापूस अजूनही त्यांच्या घरी पडुन आहे.



शासनाच्या हमीभावानुसार (MSP) कापूस खरेदी व्हावी, याकरिता CCI ची खरेदी केंद्रे सुरू असणे अत्यंत आवश्यक आहे. पण केंद्र बंद असल्याने शेतकरी खुले बाजारपेठेवर अवलंबून राहत असून, त्यांना हमीभावापेक्षा कमी दराने कापूस विक्री करावा लागत आहे. याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला बसत असून, त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

करिता भारतीय कापूस निगम चे कापूस खरेदी केंद्र त्वरित सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही. तसेच, खरेदी केंद्र कधी बंद कधी चालु का आहे? याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध करून द्यावी. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने आणि त्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी त्वरित कार्यवाही करावी असे आशयाचे पत्र भारतीय कापुस निगमचे उपमहाव्यवस्थापक व जिल्हाधिकारी, जालना व छत्रपती संभाजीनगर यांना दिले.

### जालन्यातील सीसीआय कापूस खरेदी केंद्र ९ फेब्रुवारी पर्यंत बंद...

**जालना** - सीसीआय कापूस खरेदी केंद्र ९ फेब्रुवारी बंद ठेवण्यात येणार आहे. कापूस ठेवण्यासाठी जिंनिंग मध्ये जागा उपलब्ध नसल्याने सीसीआयच कपासू खरेदी केंद्र बंद ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आलाय. जालना येथील सीसीआय कापूस खरेदी केंद्राकडून आतापर्यंत ८६ हजार क्विंटल कापसाची खरेदी पूर्ण झाली. मात्र, आता कापूस ठेवण्यासाठी जिनिंग मध्ये जागा उपलब्ध नसल्याने सीसीआय ने कापूस खरेदी केंद्र बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कापूस खरेदी केंद्राकडून जालना कृषी उत्पन्न बाजार समितीला कापूस खरेदी केंद्र ९ फेब्रुवारी पर्यंत बंद राहणार असल्याचे कळविण्यात आले आहे. मात्र, सीसीआय ने आपले कापसू खरेदी केंद्र लवकरात लवकर सुरू करावे असे पत्र जालना कृषी उत्पन्न बाजार समितीने सीसीआय कापूस खरेदी केंद्राला दिले आहे.


## विविध मागण्यांसाठी लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचं रास्ता रोको आंदोलन

**जालना । प्रतिनिधी** - जालन्यात विविध मागण्यांसाठी लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेने बुधवार (दि ५) रोजी रास्ता रोको आंदोलन केले आहे. जालना - अंबड महामार्गावर इंदेवाडी जवळ हे आंदोलन करण्यात आले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनी १ ऑगस्ट रोजी शासकीय सुट्टी देण्याची मागणी यावेळी लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली. मांतग समाजाचे आरक्षण तात्काळ उपवर्गीकरण करून लागु करण्यात यावे, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळासहीत सर्व मागासस्वर्गीय महामंडळाचे सन २०२५ पर्यंतचे १००% कर्ज माफ करण्यात यावे यासह विविध मागण्यांसाठी हे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी सुमारे अर्धा तास चाललेल्या या रास्ता रोको आंदोलनामुळे जालना - अंबड महामार्गावरील वाहतूक ठप्प होऊन महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.



दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की १)डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या। ऑगस्ट जयंती दिनी शासकीय सुट्टी देवून देशी व विदेशी दारूचे दुकाने महाराष्ट्रामध्ये बंद ठेवण्यात यावे. १ क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे पान २ वर

## अंतराळ संशोधन संस्थेतील शैक्षणिक सहलीसाठी ३४८ विद्यार्थ्यांनी दिली निवड चाचणी परीक्षा



**जालना । प्रतिनिधी** - ग्रामीण भागातील विद्यार्थ्यामध्ये संशोधन वृत्ती विकसीत होण्यास मदत, विद्यार्थ्यांना शास्त्रज्ञांच्या कार्यपध्दतीची जवळून ओळख आणि त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास चालना मिळावी या उद्देशाने महादीप उपक्रम राबविण्यात येत आहे. यातून अंतराळ संशोधन संस्थेमधील शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येणार आहे. यासाठी बुधवार दि. ५ फेब्रूवारी २०२५ रोजी तालुकास्तरावरील पात्र ३४८ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय निवड चाचणी परीक्षा जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन जिल्हा नियोजन समिती सभागृह व महसूल भवन सभागृहात उत्साहात पार पडली.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा मीना, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ.राजेंद्र कांबळे, शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे जेष्ठ अधिव्याख्याता डॉ.संजय येवते, अधिव्याख्याता सय्यद अख्तर, योगेश जाधव, भारत सुर्यवंशी, डॉ. श्रीहरी दराडे, श्रीमती निलोफर पटेल, श्रीमती प्रेरणा मोरे, उपशिक्षणाधिकारी श्याम देशमुख, सुभाष भालेराव, श्रीमती विनया वडजे,शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती गिता नाकाडे, गट समन्वयक के.जी.राठोड, कांबळे, जेटेवाड, वसंत शेवाळे, एस.बी. नेवार, अशोक ढेरे, केंद्र प्रमुख सुनिल ढाकरगे, बार्शीकर, लोखंडे, सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनिल मावकर, साधन व्यक्ती डॉ.करुणा हिवाळे, विद्या पतंगे, ज्योती चव्हाण, श्री.चव्हाण, संदिप देशमुख यांच्यासह गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापकांची उपस्थिती होती.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यामध्ये संशोधन वृत्ती विकसीत होण्यास मदत, विद्यार्थ्यांना शास्त्रज्ञांच्या कार्यपध्दतीची जवळून ओळख, शास्त्रज्ञ निर्मितीस हातभार, विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील संशोधन प्रक्रियेची माहिती, यासह वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास नक्कीच चालना मिळावी यासाठी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या इयत्ता पाचवी ते आठवी वर्गामधील मुलांची शाळा, केंद्र, तालूका व जिल्हास्तर अशी निवड चाचणी परिक्षा घेवून या परिक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना महादीप या उपक्रमांतर्गत निवड चाचणीच्या माध्यमातून निवड करुन देशातील नामांकित अशा अंतराळ संशोधन संस्था, संशोधन केंद्र या ठिकाणी शैक्षणिक सहल आयोजन करण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून महादीप या जालना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून माहे डिसेंबर २०२४ व जानेवारी २०२५ महिन्यात या पान २ वर

# संपादकीय

## गानकोकिळा... भारतरत्न...

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज तिसरा स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## पान १ वरुन

### कत्तलखान्याविरोधात ....

प्रयत्न करून हा निर्णय रद्द करावा, अशी विनंती या निवेदनात करण्यात आली आहे. निवेदन देताना संजय लव्हाडे, सुदेश सकलेचा, सुनील रायठठ्ठा, अ‍ॅड. महेश धन्नावत, विनय कोठारी, विजय जैन, प्रमोद देसरडा, विजय सकलेचा, कचरूलाल कुंकूलोळ, चेतन वायकोस, संजय बंब, डॉ. धरमचंद गादिया, प्रसन्ना कोठारी, दिनेश छाजेड़, प्रवीण पहाडे, दिलीप बकलीवाल, राहुल महेंद्रकर,आशीष जैन, राकेश बोरा गुंजन शाह, आशीष गादिया, पारसमल देसरडा, संतोष ओस्तवाल, अनिल संचेती, आशीष लूनिया यांची उपस्थिती होती.

### विविध मागण्यांसाठी ...

यांच्या १४ नोव्हेंबर जयंतीदीनी शासकीय सुटी देवून देशी व विदेशी दारूचे दुकाने महाराष्ट्रामध्ये बंद ठेवण्यात यावे. १ मातंग समाजाचे आरक्षण तात्काळ उपवर्गीकरण करून लागू करण्यात यावे. थ्महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे सन २०२५ पर्यंत १००% कर्ज माफ करण्यात यावे.

डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळासहित सर्व मागासवर्गीय महामंडळाचे सन २०२५ पर्यंत १००% कर्ज माफ करण्यात यावे. महाराष्ट्रातील मातंग समाजाच्या मुला-मुलीसाठी प्रत्येक जिल्ह्यात ५०० मुला मुलींसाठी व तालुक्यात २०० मुलामुलीसाठी सर्व सुख सुविधा निशी शासकीय वस्तीगृह उभारण्यात यावे. महाराष्ट्रातील कसत असलेले गायरान पट्टे तात्काळ नावचे करून त्यांना ७/१२ देण्यात यावा.

ग्राम पंचायत हद्दीतील जागेमध्ये अतिक्रमण केलेले आहे त्या जागा तात्काळ त्याच्या नावच्या करून ग्राम पंचायत मधील मुळ रजिस्टरला नोंद करून नमुना नं. ८ चा उतारा देण्यात यावा असे विविध मागण्या दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी गणपत कांबळे प्रदेश उपाध्यक्ष रमेश दाभाडे मराठवाडा उपाध्यक्ष बाबासाहेब पाटोळे मराठवाडा सचिव सर्जे राव पाटोळे जिल्हा अध्यक्ष जालना दिलीप उंकंडे जिल्हा सचिव दादाराव साळवे बदनापूर तालुका अध्यक्ष राजेश कांबळे जिल्हा संघटक इंद्रजीत हिवाळे चंद्रकलाबाई गवळी आशाबाई साबळे, गजानन कांबळे, विलास लोखंडे, शेख फारुख भाई यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### अंतराळ संशोधन ...

अभियानांतर्गत जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता ५ वी ते ८ वी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान व सामाजिक शास्त्र, सामान्य ज्ञान इत्यादी विषयावर आधारीत ५० गुणांची लेखी परिक्षा शाळा, केंद्र, तालुका स्तरावर आयोजित करण्यात आली होती. तालुकास्तरावर २ हजार ५०० विद्यार्थ्यांनी सदरील परिक्षा दिली होती. त्यापैकी ३४८ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड चाचणी परिक्षा घेण्यात आली या परिक्षेतून इयत्ता पाचवी ते आठवी वर्गनिहाय प्रत्येकी १० विद्यार्थ्यांची निवड करुन या महिन्यात त्यांना अंतरिक्ष केंद्र श्रीहरीकोटा, आंध्रप्रदेश, हैद्राबाद येथील विज्ञान केंद्र, या ठिकाणी शैक्षणिक सहलीची संधी उपलब्ध करुन दिली जाणार आहे. यावेळी विद्यार्थ्यांसाठी अन्नामृत फाऊंडेशनच्या वतीने अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

## लिंबू पाण्याचे फायदे

लिंबू पाणीला देशी कोल्डड्रिंक म्हणा तरी काहीही चूक नाही . प्रथिने, कार्बोहायड्रेट्स, व्हिटॅमिन आणि खनिजने समृद्ध असलेले हे पेय आरोग्य आणि सौंदर्याशी संबंधित फायदे देतात. चला तरी मग लिंबू पाण्याचे इतर फायदे जाणून घेऊ या.
लिंबू विटमिन सी चे चांगले स्रोत आहे. या मध्ये इतर व्हिटॅमिन्स जसे की थायमिन, रायबोफ्लॅविन, नियासिन, व्हिटॅमिन बी -६ फोलेट आणि व्हिटॅमिन ई थोड्या प्रमाणात आढळतात. या मुळे घसा खराब होणे,बद्धकोष्ठता किडनी आणि हिरड्यांच्या समस्येपासून आराम देतो. रक्तदाब आणि तणाव देखील कमी करतो. त्वचा निरोगी बनविण्यासह लिव्हरसाठी देखील चांगले आहे.




## विनोद

**भिकारी : साहेब, एक रुपया तरी द्या. दोन दिवस जेवलो नाही.**
**शेठजी : एक काय दोन रुपये देतो, पण एका रुपयात जेवण कुठे मिळते ते आधी सांग!**

## उपदेश कथा

### शहरी आणि खेडवळ

एका शेतातल्या उंदराने शहरवासी मित्राला आपल्या घरी जेवायला बोलविले. शहरी मित्राने कुतूहलाने ते आमंत्रण स्वीकारले पण जेवणाचे पदार्थ म्हणजे नुसती धान्येच होती. ते पाहून शहरी उंदीर म्हणाला, 'मित्रा, तू अगदी साध्या किड्यामुंगीसारखा जगतोस असं दिसतं. तू आता माझ्याबरोबर शहराकडे चल. तिथं सगळे चांगले पदार्थ आहेत. आपण दोघं मिळून ते खात जाऊ.'

त्याप्रमाणे ताबडतोब ते दोघे शहरात गेले. शहरी उंदराने त्या खेडवळ उंदराला पाव, खवा, सुकामेवा, शेंगा, साखर आणि फळफळावळ दाखविली. ते पाहून खेडवळ उंदीर अगदी दीपून गेला. त्याने आपल्या मित्राच्या भाग्याची स्तुती केली आणि स्वतःच्या कमनशिबाबद्दल त्याला वाईट वाटले. ते जेवायला सुरुवात करणार इतक्यात दार वाजले. त्याबरोबर ते दोन छोटे जीव इतके घाबरले की ते एका फटीत लपले. जरा वेळाने ते परत सुक्यामेव्याला तोंड लावणार तोच पुन्हा दुसरे कोणीतरी त्या खोलीत आले आणि पुन्हा ते दोघेजण जीव घेऊन आपल्या बिळात शिरले. मग मात्र उपाशी राहावे लागले तरी चालेल पण आपलंच घर बरं असा त्या खेडवळ उंदराने निश्चय केला. 'राम राम मित्रा!' तो उसासा टाकून म्हणाला, 'मला आपलं माझं ते कच्चं धान्यच बरं वाटतं.

**कथा उपदेश : भीतीयुक्त श्रीमंती जीवनापेक्षा शांततामय आणि साधे गरिबी जीवन चांगले.**


## गुरुवचन

### जर मनच अशुद्ध तर.....

खूप जुनी गोष्ट आहे. एकदा संत कबीर बसले होते. त्यांच्याकडे एक व्यापारी धावत आला. त्याने कबीरांना विनंती केली, 'मला तुम्हाला माझा गुरू करायचे आहे, तुम्ही मला गुरुमंत्र द्या' तेव्हा संत कबीरांनी त्याला पैसे दिले आणि सांगितले आधी तू पटकन जाऊन दूध घेऊन ये, मग मी तुला गुरुमंत्र देतो. त्या व्यापाऱ्याला खूप घाई होती. तो तडक धावत गेला आणि त्याने दूध कबीरांना आणून दिले. कबीरांनी त्याला एक भांडे दिले आणि सांगतले, हे दूध या भांड्यात ओत. त्याने ते भांडे घेतले, त्यात प्रचंड घाण साचली होती. त्या व्यापाऱ्याने कबीरांना ही बाब सांगितली. ते म्हणाले, बघ जर तू या खराब भांड्यात दूध टाकायला तयार नाहीस तर, मग मी तुझ्या अशुद्ध मनात राम नावाचा मंत्र कसा देऊ? ' कबीरांनी म्हटलेले वाक्य किती खरे आहे बघा? जर तुमचे मनच शुद्ध नाही तर तुम्ही देवाचे दर्शन घेतले काय, किंवा संत सानिध्यात राहिलात काय, त्याचा काय परिणाम होणार? संतांनीही हेच सांगितले आहे. भलेही तुम्ही पुजा नका करू, परंतु तुम्ही तुमचे आचरण, आणि मन शुद्ध ठेवा. आपण इतरांना एखाद्या कामासाठी दोष देत असतो, पण त्याची त्यामागची भूमिका समजून घेणे गरजेचे असते. आणि आपण नेमके या उलटच करतो. आपल्या दैनंदिन कामात आपण अनेकांना भेटत असतो, यात प्रत्येक व्यक्ती आपल्याला चांगलीच भेटते असे नाही, तर प्रत्येकाचा स्वभाव वेगवेगळा असून शकतो. त्यांच्या स्वभावानुसार त्यांना काम देणे गरजेचे आहे. बदलायची असतील तर त्यांची मने बदलण्याचा प्रयत्न तुम्ही करा. त्यांच्या मनातील कटुता कमी करा. कारण कबीरांनी म्हटल्याप्रमाणे, खराब भांड्यात ज्या प्रमाणे तुम्ही दूध नाही टाकणार त्या प्रमाणेच एखाद्याचे मन परिवर्तन झाल्याशिवाय तुम्ही त्याला बदलू नाही शकणार.

## शब्दांचे कोडे

**आडवे शब्द**
१. अद्भुत, विचित्र
३. काळे ज्वालाग्रही खनिज
५. झोंबणारे
८. अस्वल, माकड यांना खेळणिारा
१०. निकट
११. हिरा, पाचू इ. प्रकार
१२. मुलगी
१४. चकणा
१५. गावाची हद्द
१६. समशीतोष्ण
१७. मांडणी, सजावट
१९. किंमत
२१. माळ, हार
२२. अस्वल
२५. श्रीविष्णुचा अष्टाक्षरी यंत्र
२८. आणि
२९. तोडण्यास कठीण झालेला पदार्थ
३०. स्वाद, रूची
३१. बस्तान
३२. स्त्रियांची छेड काढणारा
३३. बसण्याची फळी
३५. राणीचा नवरा
३७. रंग (इंग्रेजी)
३९. फुलांची छोटी टोपली
४१.कूर्म
४२. अटीची भाषा
४३. शेतातील पेरणी
४४. वायू, हवा, त्रास
४५. सोने
४७. वर्षाची सुरुवात
४९. अंतःकरण
५०. लेखणी
५१. हत्तींचा शिक्षक
५२. प्रचंड गोंधळ
५३. गीत
५४. जीभ
५६. कट्टा
५९. गाढव
६०. जैन साधू
६२. कपाळ फुटणे
६५. साखरपाकात आवळा
६७. लक्ष्मीचे एक नाव
६८. अंगावरील बारीक केस
७०. सूर्योदय
७१. शर्करा
७३. एक केसाळ पेरणी
७५. राम दासस्वामींचा एक ग्रंथ
७६. हिमालयावर तिरंगा फडकवणारा शेर्पा
७८. खंदक
७९. क्रिकेटमधील धाव
८०. मधली छोटी विश्रांती
८१. शिव! शिव!
८२. डोंगराचा उभा भाग



**उभे शब्द**
१. गेलेला, गत
२. माफी मागणे
३. न वापरलेली, नूतन
४. सोज्वळ
५. पोळी-भाकरीचा चौथा भाग
६. वात्रट, चावट
७. हुशार, चलाख
८. एक धान्य
९. पांगापांग, वाताहत
१३. पुरुष
१८. निराश
२०. प्रतिबंध, बंदी
२१. उत्सवाचे दिवस
२३. सडपातळ
२४. सजावट करणारा
२६. मृत्यूचा राजा
२७. जुळे
२९. वितरण
३४. अपमान
३६. शत्रूला नामोहरम करण्याचे मंत्रतंत्र
३७. लाकूड कापण्याचे हत्यार
३८. गेरु, कुंड्यांना रंग
४०. पाठवणी
४३. फायदेशीर
४६. माझे
४८. वर्ण
५०. वाळवी
५४. झाड, वृक्ष
५५. पहारेकरी
५६. पाप करण्यास भिणारा
५७. ओढ्यावरील छोटा पूल
५८. च्या पुढे, समक्ष
६१. तांदुळाची एक जात
६३. परीक्षा, तपासणी
६४. माफी मागणारा
६६. मोहरी लावलेले तोंडीलवणे
६९. वस्त्र, कापड
७०. नीच, पातकी
७१. समुद्र
७२. खोडण्याचे साधन
७४. पांढुरका रंग
७७. वनराज

### जिल्हा रेल्वे संघर्ष समितीची रेल्वे स्टेशन येथे महत्वाची बैठक

# केंद्र सरकार ने महाराष्ट्र राज्याच्या रेल्वेसाठी २३,७७८ कोटी घोषित केल्याबद्दल स्वागत

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा रेल्वे संघर्ष समितीची ४ फेब्रुवारी रोजी दुपारी एक वा. च्या सुमारास रेल्वे स्टेशन येथे महत्वाची बैठक संपन्न झाली. रेल्वे संघर्ष समितीच्या बैठकीमध्ये केंद्र सरकारने राज्य शासनाला रेल्वे विकासासाठी २३,७७८ कोटी घोषित केल्या बद्दल या बैठकीत केंद्र सरकारचे आभार व्यक्त करण्यात आले. तसेच राज्य सरकार ने जालना खामगाव, व जालना-जळगाव नवीन लोहमार्ग साठी राज्य सरकार च्या ५०%निधी अधीच सिंदे सरकार ने केबिनेट मध्ये मान्यताचे ठराव घेण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने मराठावाडा,विदर्भ, व खानदेशला जोडण्यात यावे.. व मागास जिल्हे जालना, बुलढाणा, जळगावला विकसित करण्यासाठी या दोन्ही रेलवेला भरपूर निधी उपलब्ध करुन देण्यात यावा असा अवाहनही राज्य सरकारला करण्यात आला.




जालना रेलवे संघर्ष समीती वृद्धिंगत करण्यासाठी जालन्यातील प्रतिष्टीत नागरिकांची सदस्यपदी निवड आजच्या बैठकीत करण्यात आलीय..ओबीसि नेते,संघर्ष योद्धा नवनाथ आबा वाघमारे, इटीव्ही भारतचे जिल्हा प्रतिनिधी सुयोग खर्डेकर,जालनाचे जय महाराष्ट्रचे जिल्हा प्रतिनिधी पत्रकार गणेश जाधव, भष्ट्रचार विरोधी लोकांधिकारचे संपादक सय्यद अफसर सय्यद सिकंदर, सामाजिक कार्यकर्त्या ममताताई कायंदे, सामाजिक कार्यकर्त्या शालिनीताई मुळे, महंमद मुश्ताक यांना सदस्यत्वाचे नियुक्तीपत्र देण्यात आले...जालना रेल्वे संघर्ष समितीच्या आयोजित बैठकीत महासचिव फेरोज अली, सचिव अशोक मिश्रा, डॉं राधेशाम जैस्वाल, डॉं केदार करावा, सुरेश सदगुरे, धर्मा खिल्लारे, राम गायकवाड, नंदू काका चौधरी,मान्यवराचे हस्ते सर्व नूतन सदस्यचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. जालन्याचे पालकमंत्री पंकजा मुंडे, खासदार डा. कल्याण काळे,व आ. बबन रावजी लोणीकर, माजी रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनात जालना रेल्वे संघर्ष समितीचे शिष्टमंडळ मुबंई दिल्ली येथे जाऊन भेटणारअसून व इतर स्थानिक रेल्वे समस्या सोडविण्याचं आश्वासन जालना रेल्वे संघर्ष समितीने दिलाय.... या बैठकीचे प्रास्ताविक जालना रेल्वे संघर्ष समितीचे महासचिव फेरोज अली यांनी केले तर आभार प्रदर्शन नवनिर्वाचित सदस्य गणेश जाधव यांनी मानले.

# छत्रपती संभाजी नगर येथे द्वितीय शिक्षक साहित्य संमेलन

### टेंभुर्णीचे संतोष औटी यांच्या हस्ते चित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन



**दत्ता देशमुख**
**टेंभुर्णी -** छत्रपती संभाजी नगर येथील द्वितीय शिक्षक साहित्य संमेलनाचे नुकतेच उद्घाटन झाले. या उद्घाटन समारंभात विविध दालनाचे उद्घाटन संपन्न झाले. या संमेलनातील चित्रप्रदर्शन दालनाचे उद्घाटन टेंभुर्णीचे प्रसिद्ध चित्रकार संतोष बाबुराव आवटी यांच्या हस्ते झाले. टेंभुर्णीकरांच्या इतिहासात संतोष बाबुरावऔटी यांना दुसऱ्यांदा हा बहुमान मिळाला. प्रथम बहुमान त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या साहित्यसंग्रहाचे प्रथम विश्व साहित्य संमेलन याचा लोगो बनवण्याचा मान यांना मिळालेला होता. तसेच तेथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांचे चित्र प्रदर्शन भरवण्याचा मानही त्यांना मिळाला होता. टेंभुर्णीच्या या भूमिपुत्रांचा ऐतिहासिक व साहित्य क्षेत्रातही मान ठेवला गेला. त्यांना शिक्षक साहित्य संमेलनाच्या चित्र प्रदर्शन उद्घाटनाचे प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून मानसन्मान मिळाला. या शिक्षक साहित्य संमेलनाच्या प्रमुख उद्घाटनाच्या कार्यक्रमांमध्ये ते प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित होते. या संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख उद्घाटक म्हणून छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, संमेलनाच्या अध्यक्षा आशा खरतडे डांगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, शिक्षण क्षेत्रातील विभागीय शिक्षण उपसंचालक प्रकाश मुकुंद, सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षणाधिकारी मधुकर देशमुख, अरुणा भुमकर शिक्षणाधिकारी योजना, अश्विनी लाटकर शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, आदींची प्रमुख उपस्थिती होती. या प्रदर्शनामध्ये चित्रप्रदर्शन समिती स्थापन करण्यात आली होती यात प्रसिद्ध साहित्यिक साईनाथ फुसे हे त्याचे प्रमुख होते. या शिक्षक साहित्य संमेलनामध्ये ग्रंथदिंडी, परिसंवाद, निमंत्रितांचे काव्य संमेलन, अशा प्रकारचे विविध कार्यक्रमाने शिक्षक साहित्य संमेलन संपन्न झाले. प्रसिद्ध चित्रकार संतोष बाबुरावऔटी यांना सन्मान मिळाल्याबद्दल त्यांचे, आदर्श शिक्षक शेख जमीर सर, मुंबई लोककला अकादमीचे डॉक्टर गणेश चंदनशिवे, वेद रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्राचे प्रांत उपाध्यक्ष प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्राची जाफराबाद तालुका अध्यक्ष शेख अशपाख, अल्केश सोमानी, डॉक्टर सुरोशे,संतोष घोडके, बबन महामुनी, विश्वनाथ सांगोळे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, मुकुंद आवटी, असलम शहा आदींची उपस्थिती होती.

# मंठा पोलीसांनी अवैध रेती वाहतुक करणारे तीन ट्रॅक्टर पकडले



**मंठा । प्रतिनिधी -** मंगळवारी रोजी गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, पोलीस ठाणे मंठा हद्दीमध्ये तळणी परीसरात पोखरे केंधळी येथे अवैध वाळु वाहतुक सुरु आहे. खात्रीलायक बातमी मिळताच. मा. पोलीस निरीक्षक श्री निकाळजे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक नेमुन दिनांक ०४.०२.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० ते १८.३० वाजे दरम्यान मौजे पोखरे केंधळी ता. मंठा येथील पुर्णा नदी पात्रातुन अवैध रेती वाहतुक करतांना तिन ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आले. यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असुन रेती व ट्रॅक्टर असा एकुण २१,२४,०००/- (एकविस लाख चोवीस हजार) रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस हवालदार मुंढे हे करत आहेत. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक जालना अजयबन्सल, अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी परतुर दादाहरी चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक रविंद्र निकाळजे, पोउपनि संतोष माळगे, यांच्या सह पोलीस ठाणे मंठा येथील तुळशीराम बिजुले, मनोज काळे, आसाराम मदने, श्रीकांत काळे, संतोष बनकर ईत्यादी स्टाफ यांनी केली.

### खंडणीसाठी मुलाचे अपहरण

# जालना पोलिसांकडून आरोपींना अटक; मुलाची केली सुटका



**जालना । प्रतिनिधी -** दोन कोटी रुपयांच्या खंडणीसाठी एका सात वर्षाच्या मुलाचं छत्रपती संभाजीनगरमधून अपहरण करण्यात आलं होतं.. त्यानंतर आरोपी हे जालन्यातील भोकरदन जाफराबाद परिसरात गेले असल्याची गोपणीय माहिती जालना पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार तपास करत असताना भोकरदन तालुक्यातील ब्रम्हपुरी येथे एका कारचा अपघात झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर त्यातील जखमीला पोलिसांनी रुग्णालयात दाखल केलं. त्याची चौकशी केली असता त्याने मुलाचं अपहरण केलं असल्याच्या गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर दिलेल्या लोकेशनवरून पोलिसांनी मुलाची सुटका केली आहे. यात दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली असून पोलीस पुढील कारवाई करत असल्याची माहिती पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी आज दिनांक पाच बुधवार रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास दिली

# गावठी कट्टा बाळगणाऱ्या तरूणाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या

**जालना । प्रतिनिधी -** गावठी कट्टा बाळगणाऱ्या एका तरुणाला जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. गंगाधरवाडी रेवगाव रोड परीसरात पोलिसांनी ही कारवाई केली.
जालना शहरातील पोलीस ठाणे तालुका जालना हद्दीत गंगाधरवाडी रेवगावरोड जालना स्थागुशा पथकाने येथे छापा मारुन गोपनिय माहितीच्या आधारे दिनांक ०३/०५/२०२५ रोजी पोलीस ठाणे तालुका जालना हद्दीत इसम नामे विकास गणेश म्हस्के वय २३ वर्ष रा गंगाधरवाडी रेवगावरोड जालना याचे कडुन एक गावठी पिस्टल ४० हजार रुपये किमतीचे, जप्त केले आहे. नमुद आरोपी विरुध्द जालना तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती आज दिनांक ४ मंगळवार रोजी सकाळी ९:०० वाजेच्या सुमारास पोलिसांनी प्रेस नोट द्वारे दिली.
सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उप विभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक पंकज जाधव, योगेश उबाळे, सहायक पोलीस निरीक्षक, राजेंद्र वाघ, पोलीस उप निरीक्षक, व पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, गोपाल गोशिक, भाऊराव गायके, रमेश राठोड, लक्ष्मीकांत आडेप, फुलचंद गव्हाणे, ईर्शाद पटेल, सतीष श्रीवास, आकृर धांडगे, देविदास भोजने, रमेश काळे, कैलास चेके, यांनी केली.

## बहारदार नृत्यांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध!

**जालना -** इंदेवाडी येथील जालना पब्लिक स्कूल व गोदावरी इंग्लिश स्कूलचे पाचवे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक ३१ जानेवारी रोजी मोठ्या थाटात संपन्न झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक बहारदार नृत्य सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. प्रेक्षकांनीही विद्यार्थ्यांना भरभरून रोख स्वरूपात बक्षीस देत विद्यार्थ्यांच्या कलागुणांची वाहवा करत दाद दिली. यावेळी स्टुडंट्स ऑफ द इअर समृद्धी औरंगे तर टीचर ऑफ द इयर श्रीमती दिपाली हजारे यांना सन्मानित करण्यात आले.

# परतूरच्या शास्त्री विद्यालयात स्वयंशासन दिन साजरा



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील छत्रपती शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयात सोमवारी स्वयंशासन दिन (स्कुल डे) उत्साहात साजरा करण्यात आला.या दिवशी शाळेचे सर्व कामकाज दहावीच्या विद्यार्थ्यांनी हाताळले. रोहित बळीराम राठोड या विद्यार्थ्याने मुख्याध्यापकाची जबाबदारी पार पाडली.
दहावीच्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, लिपिक, सेवक या पदाची एक दिवशीय भूमिका पार पाडली. अर्थात शालेय कामकाजाचा अनुभव घेतला.
एकूण पाच तासिका घेण्यात आल्या. त्यानंतर समारोप झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी शिकवत असताना आलेले अनुभव विषद केले. विद्यार्थ्यांना दहावीचे वर्गशिक्षक रामराव पवार, हरिओम कोरके, किरण गवई व बळीराम राठोड यांनी मार्गदर्शन केले.
यावेळी पर्यवेक्षक राजकुमार राऊत यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समृद्धी गाडगे व आदिती कंठाळे यांनी संयुक्तपणे केले.यावेळी विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्षपदी अमोल बोराडे तर सचिवपदी शामराव देशमुख



**मंठा । प्रतिनिधी -** येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ ची बैठक शासकीय विश्राम गृह कैलास बापू बोराडे व कुलदिप बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याप्रसंगी सर्वानुमते सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष पदी अमोल बोराडे तर सचिव पदी शामराव देशमुख उपाध्यक्ष निवृत्ती बोराडे अमोल माने, कोषाध्यक्ष विजय बोराडे, सहकोषाध्यक्ष रामेश्वर भोसले , सचिव शामराव देशमुख ,सहसचिव सचिन चव्हाण अनिल बोराडे, प्रसिद्धीप्रमुख आकाश आघाम, करण बोराडे ,गोविंद बोराडे, कृष्णा बोराडे, गजानन माळकर, संघटक, गोपाळ गायकवाड, पांडुरंग बोराडे ,बाळू खरात, गणेश बोराडे, शिवाजी बोराडे, सुजित बोराडे ,विकास बोराडे, भागवत बोराडे, सदस्य.. सतिश राठोड, ओमकार बोराडे, आदित्य मोरे, लक्ष्मण बोराडे रामेश्वर बोराडे सतीश कळणे कुलदीप बोराडे यांची निवड करण्यात आली. तर सल्लागार समिती .. कैलास बापू बोराडे, शिवाजी जाधव, संजय बोराडे ,एकनाथ काकडे, रणजीत बोराडे, विष्णू वायाळ ,बाजीराव बोराडे ,शामराव काकडे, संतोष बोराडे ,दिगंबर बोराडे, सर्जेराव काका बोराडे, सुनील ठोंबरे, चंदू भाऊ बोराडे ,गजानन बोराडे, प्राचार्य नेताजी मुळे, शरद पोटे यांच्यासह बैठकीला मंठा तालुक्यातील शिवप्रेमी उपस्थित होते.

# ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या केंद्रात स्नेहमिलन; महिलांनी दिला एकत्वाचा संदेश

**जालना । प्रतिनिधी -** ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या जालना केंद्रात संक्रांतीनिमित्त भव्य सांस्कृतिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उपस्थित महिलांनी तिळगुळ वाटून आपुलकीचा आणि स्नेहाचा गोडवा वाटून एकत्वाचा संदेश दिला.
कार्यक्रमाची सुरुवात राजयोगिनी शितल दीदी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी मनीषाताई टोपे, विमलताई आगलावे, माजी नगराध्यक्षा कल्पना लाहोटी, भाजपाच्या महिला जिल्हाध्यक्ष संध्या देठे, माजी नगरसेविका पुनम स्वामी, सुषमा पायगव्हाणे, मेघा गिंदोडिया, ज्योती मानधना, छाया डागा, भारती मोरे, श्रुती लाहोटी, कोमल डागा, प्रमिला मंत्री, शोभा तोतला, सावित्रीबाई मल्लावत, आदर्श भगिनी मंडळाच्या अध्यक्ष विजया लाळे .आणि ॲड वीणा साबू यांची प्रमुख उपस्थिती होती.



संक्रांत हा केवळ तिळगुळ देण्याचा सण नसून तो एक सामाजिक ऐक्य, सौहार्द आणि आत्मिक समाधानाचा प्रतीक आहे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. महिलांनी परस्परांना तिळगुळ देत गोड बोला, गोड वागा हा शुभसंदेश दिला आणि आपल्या मनातील स्नेहभावना व्यक्त केल्या. या निमित्ताने हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले. सर्व क्षेत्रातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकमेकींना वाण देऊन परस्पर सन्मान व्यक्त केला. या मंगल सोहळ्यात स्त्रीशक्तीचा गौरव करण्यात आला. विविध क्षेत्रांत यशस्वी वाटचाल करणाऱ्या महिलांनी स्त्री-शक्तीच्या महत्त्वावर आणि सामाजिक योगदानावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमामुळे महिलांमध्ये आत्मीयता वृद्धिंगत झाली आणि संक्रांतीचा सण केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक सौहार्द वाढवणारा सण आहे, हे अधोरेखित झाले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थित महिलांनी एकत्र येऊन परस्परांना शुभेच्छा दिल्या आणि आनंदाची गोड आठवण मनात साठवली.

# शिक्षक भरतीच्या मागणीसाठी सेवलीत उपोषणाचा दुसरा दिवस



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील सेवली येथे जिल्हा परिषद शाळेसमोर शिक्षक भरतीच्या मागणीसाठी शालेय समितीच्या वतीने आमरण उपोषण काल दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ पासून जिल्हा परिषद प्राथमिक शिवली शाळा येथे सुरू करण्यात आले आहे.

या आमरण उपोषणाला आजचा दुसरा दिवस असून यामध्ये या शालेय समितीच्या उपोषणकर्त्यांनी मागणी केली आहे की ८ ९ १० च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे शिक्षक मिळाले नाही तसेच यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे त्यामुळे आमरण उपोषण सुरू करण्यात आले असून या वामन उपोषणाचा आजचा दुसरा दिवस आहे आणि या आमरण उपोषणाला शाळेतील आठवी नववी दहावीच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा वर्ग बंद करून जाहीर पाठिंबा आज दिला आहे आणि जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहील असा इशारा या उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

मात्र या आमरण उपोषणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे पाहायला मिळाले आहे.

# डॉ राज पाटील यांचा दिल्लीत होणार सन्मान



**जालना । प्रतिनिधी -** दिल्ली येथे ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे या संमेलनाचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी साहेब यांच्या शुभहस्ते होणार आहे दिनांक २१ २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे त्यामध्ये माननीय श्री शरदचंद्र पवार महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ राज्यमंत्री श्रीमती रक्षा खडसे उद्योग मंत्री उदय सामंत मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहे या संमेलनात जालना जिल्ह्याचे ड डॉ श्री राज साहेब पाटील यांनी दिल्लीमध्ये मराठी अस्मिता संस्कृती आणि भाषा जिवंत ठेवण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न केले त्याबद्दल त्यांचा सन्मान होणार आहे हा सन्मान दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन मध्ये होणार आहे असे पत्र त्यांना पाठविण्यात आले आहे जालना जिल्ह्यात ही गौरवाची बाब आहे जालना जिल्ह्यातून त्यांचे मित्रपरिवार व नातेवाईक यांच्याकडून डॉ राज साहेब पाटील यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# मानधन वाढ मागील फरकासह कामगाराच्या खात्यावर त्वरीत जमा करा

## सिटू सलग्न शालेय पोषण आहार कामगार संघटनेचा जिल्हा परिषदेवर धडक मोर्चा




**जालना । प्रतिनिधी -** सिटू सलग्न शालेय पोषण आहार कामगार संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेवर शालेय कामगारांच्या विविध मागण्यांसाठी धडक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व संघटनेचे अध्यक्ष मधुकर मोकळे सरचिटणीस ड.अनिल मिसाळ उपाध्यक्ष शेषराव कान्हेरे, कृष्णा काटकर बाबासाहेब पाटोळे,दत्तात्रय बोराडे, यांनी केले अंबड चौफुली पासून निघालेल्या मोर्चात आंदोलकांनी किमान वेतन आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे ,शालेय कामगारांना पेन्शन मिळालीच पाहिजेत, शालेय कामगारांना किंवा वेतनानुसार २६ हजार रुपये मानधन मिळाले पाहिजे. अशा मागण्यांच्या घोषणाबाजी केली व जिल्हा परिषदेच्या आवारात कामगारांची सभा घेऊन शिक्षण विभागातील अधिकारी श्री कुलकर्णी सर व श्री आटोळे सर यांना निवेदन देण्यात आले त्या निवेदनात म्हटले की, केंद्र सरकारने शहरी व ग्रामीण भागात इ. पहिली ते आठवी वर्गात शिकणाऱ्या मुला-मुलींसाठी मध्यान्ह भोजन योजना सन २००२-२००३ पासून सुरू केली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने ही योजना संपूर्ण देशात राबवली जाते. योजना लागू करण्यापाठीमागे शाळेतील पटसंख्या वाढावी, मुलांची गळती थांबवावी, कुपोषणावर नियंत्रण करण्यात यावे हा हेतू होता. या योजनेमुळे आर्थिक सामाजिक दृष्ट्या मागास कुटुंबातील मुलांच्या शैक्षणिक विकासास मोठा हातभार लागला आहे. या योजनेचे सकारात्मक परिणाम सुद्धा दिसून आले आहेत. शाळेतच अन्न शिजवून देण्याच्या पद्धतीमुळे मुलांचे आरोग्य सुधारून शिक्षणाची गोडी मुलांना लागली व विद्यार्थ्यांची पटसंख्या ही वाढली.

परंतु गोरगरिबांच्या मुलांचे कुपोषण दूर करणाऱ्या कामगारांना आजही अत्यंत तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागते.आणि ते देखील वेळेवर मिळत नाही. त्यामुळे कामगारांचे प्रचंड हाल होत आहेत, या सर्व बाबीचा परिणाम कामगारांच्या कुटुंबियावर होत आहे.त्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः यामध्ये काम करणाऱ्या महिला विधवा, परित्यक्ता, दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक समुदायातील आहे. फुले, शाहू, आंबेडकरांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रामध्ये शिक्षण विभागात काम करणाऱ्या कामगारांवर इतक्या कमी मानधनावर काम करण्याची वेळ येते ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. तसेच त्यांना कुठल्याही सामाजिक सुरक्षेचा लाभ मिळत नाही.

२०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आश्वासित केलेली एक हजार रुपये मानधन वाढ त्वरित कामगाराच्या खात्यावर मागील फरकासह जमा करा. यासह खालील मागण्या करण्यात आल्या. १. शालेय पोषण आहार कामगारांना किमान वेतनानुसार २६००० रु.मानधन द्या.२. दि.१८ डिसेंबर २०२३ च्या महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाची त्वरित अंमलबजावणी करण्यासाठी मुख्याध्यापकांना आदेशित करावे. ३. विद्यार्थ्यांच्या आरोग्यास घातक असलेली सेंट्रल किचन पद्धती बंद करा. ४. २००५ च्या शासन निर्णयानुसार सनियंत्रण समिती स्थापन करून त्यामध्ये संघटनेचा एक प्रतिनिधी घ्या.५. शालेय पोषण आहार कामगारांना १० महिन्याऐवजी १२ महिने मानधन द्या.६. सन २०२४ मध्ये केलेली वाढ त्वरित कामगाराच्या खात्यात जमा करा. ७. इंधन भाजीपाला, पूरक आहार व खिचडीचे साहित्य आणण्याचा अधिकार कामगारांना द्या. ८. ज्या कामगारांचे वय ६५ वर्ष झाले त्या कामगारांना सेवापुर्ती लाभ म्हणून १ लाख रुपये द्या. व ३ हजार रुपये प्रतिमहा पेन्शन लागू करा. त्याच कुटुंबातील एका व्यक्तीचे नाव पोषण आहार कामगार म्हणून शाळेमध्ये नियुक्त करा. ९. शालेय पोषण आहार कामगारांना गणवेश व इतर अत्यावश्यक साहित्य देण्यात यावे. १०. विनाकारण विनाचौकशी कामगारांना कामावरून कमी करू नये. व जुन्या कामगारांकडून करारनामा घेणे बंद करा.११. शालेय पोषण आहार कामगारांना स्वयंपाकी व मदतनीस चा दर्जा द्या व त्यांना चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून मान्यता द्या. १२. गोरगरीब मुलांना शिक्षण नाकारणारे नवीन शिक्षण धोरण रद्द करा. १३. शालेय पोषण आहार कामगारांची भरती करताना पटसंख्येची अट रद्द करा. व शालेय पोषण आक्रमणास शासकीय कर्मचारी दर्जा द्या. यावेळी संघटनेचे यादवराव डीघे, कृष्णा काटकर,सुधाकर छडीदार, कृष्णा सवडे, चंपाबाई दाभाडे, अशोक साळवे ,गोविंद चांदगुडे, यशोदा देशमुख मीरा पुगळे, गयाबाई वाघ, शिवाजी बोडके, अब्दुल पठाण, संतराम बरकुले, नानाबाई चव्हाण, लता वीर, संगीता पवार,सुनिता पिंपळे, प्रतिभा आहेर, आशा मिसाळ, जगन वाघमारे, अंजना राऊत ,सविता साळवे यांच्यासह मोठ्या प्रमाणात कामगारांची उपस्थिती होती.

# घरात डांबून ठेवलेल्या विवाहितेची बाळासह सुटका

## अजयकुमार बंसल यांची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील एक धक्कादायक घटना समोर आली आहे याविषयी सविस्तर माहिती अशी की भोकरदन शहरापासून जवळच असलेल्या अलापूर या गावांमध्ये विवाहित महिलेच्या आई-वडिलांनी व भावांनी आपल्या बहिणीने आंतरजातीय विवाह केला म्हणून ती माहेरी आली यावेळी तिला व तिच्या पाच वर्षाच्या चिमुकल्या मुलाला साखर दंडाने बांधून ठेवले होते सदर घटनेला दोन महिने झाले तरी ती महिला सापडत नसल्यामुळे तिच्या पतीने अखेर छत्रपती संभाजीनगर येथील न्यायालयात दाद मागितली व न्यायालयाच्या आदेशावरून काल दिनांक ३ सोम रोजी पोलिसांनी सदर महिलेची सुटका तिच्या आई-वडिलांच्या घरून केली आहे यावेळी या महिलेला व तिच्या पाच वर्षाच्या चिमुकल्या मुलाला चक्क आई-वडिलांनी साखळदंडाने बांधून घरात दोन



महिन्यापासून कोंबून ठेवले होते यावेळी पोलिसांनी मोठ्या संघर्षाने या महिलेला सुखरूप बाळासह बाहेर काढली व माननीय न्यायालयासमोर हजर केले व त्यानंतर तिला त्याच्या पतीच्या ताब्यात दिले आहे अशी माहिती पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी आज दिनांक ४ मंगळवार रोजी दुपारी दोन वाजता दिली आहे..

# महानगरपालिकेची बदनामी टाळा - वाघमारे



**जालना । प्रतिनिधी -** शहर खड्डेमुक्त करुन महानगरपालिकेची बदनामी टाळा असं आवाहन करतानाच गोरगरिबांचे अतिक्रमण काढू नका,अन्यथा रस्त्यावर उतरू असा इशारा ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी मंगळवार रोजी दुपारी २:०० वाजेच्या सुमारास हॉटेल मेरिट येथे दिला आहे.गेल्या काही दिवसांपासून जालना शहरातील वेगवेगळ्या भागात अतिक्रमण काढण्याचं काम सुरू आहे.मात्र अतिक्रमण काढताना भेदभाव केला जात आहे.अतिक्रमण काढायचे असतील तर आधी राजकारण्यांचे अतिक्रमण तोडून दाखवा असं आव्हान देखील ओबीसी आंदोलक वाघमारे यांनी दिलं आहे. गरिबांचे अतिक्रमण काढून गरिबाला संपवण्याचं काम करू नका,गरिबांचे अतिक्रमण काढाल तर रस्त्यावर उतरू असा ईशारा ओबीसी आंदोलक वाघमारे यांनी महापालिककेला दिला आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.